# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
**( शिक्षण विभाग )**

क्र.3145/शि.वि. दि06/09/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– गांधी विचार परीक्षेतविद्यार्थ्यांना सहभागी करण्याबाबत.**

**संदर्भ:– सुनील पाटील, कार्यवाह, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, नागपूर यांचे पत्र क्र. एमजीएसएन/2014–15/34 दि. 18.08.2014.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महात्मा गांधी याचा जिवन परीचय व विचारांची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून म.न.पा. शाळांमध्ये दि. 02/10/2014 रोजी गांधी विचार परीक्षेचे आयोजन करावयाचे आहे. याबाबत महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, नागपूर यांनी संदर्भिय पत्राव्दारे कळविले असून सदर परीक्षा मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणात आपल्या शाळेमध्येच घ्यावयाची आहे. याकरीता शाळेतील दोन शिक्षकांचा समावेश करून परीक्षण समिती नेमावी. त्यांना स्पर्धेतील सर्व प्रश्न पत्रिकांच्या परीक्षणाची जिम्मेदारी दयावी.

प्रश्नावली 100 गुणांची आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. प्रश्नपत्रिका लाल शाईने परीक्षण करून त्यांचे एकूण गुण प्रश्नपत्रिकेच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात ठळकपणे लिहावे. सदर परीक्षा दोन गटांत होत असून पहिला कनिष्ठ गट 4 थी ते 7 वी, वरीष्ठ गट 8 वी ते 12 वी पर्यंत राहील. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण असून प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ, बहूपर्यायी म्हणजेच चार पैकी एक पर्याय निवडणे या पध्दतीवर आहे. योग्य पर्यायाचा अंक पेनाने गडद डार्क करावयाचा आहे. पेपरची वेळ 2 तासाचा राहील. प्रश्नपत्रिकेच्या पाठीमागच्या बाजूस विद्यार्थ्यांचे नाव, शाळेचे नाव अशी पूर्ण माहिती दिलेली आहे. पाठीमागच्या बाजूस मुख्याध्यापकांची सही व शिक्का राहील.

याबाबत अधिक माहितीसाठी 1) श्री. सुनील पाटील कार्यवाह, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कस्तूरबा भवन बजाजनगर, नागपूर मो.नं. 9422149668, 9860003075 2) श्री. भाऊसाहेब घवघवे, नंदनवन हायस्कूल 481, न्यु नंदनवन नागपूर–09 फोन नं. 0712–2712463 मो. नं. 9423103047 यांच्याशी संपर्क साधून इच्छूक विद्यार्थ्यांची यादी सादर करावी तसेच परीक्षा ही कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेवून मुख्याध्यापकांनी आपल्या नियंत्रणात आयोजित करावी.

**टिप :– सदर परीक्षेची फी रू. 10/– आहे. सदर परीक्षा ही ऐच्छीक असून इच्छूक विद्यार्थ्यांकडून परीक्षा फी गोळा करून आयोजकांशी संपर्क साधावा.**

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलीपी :–**

1) श्री. सुनील पाटील कार्यवाह, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कस्तूरबा भवन बजाजनगर, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc